अहमदनगर जिल्हा परिषद
सार्वजनीक बांधकाम उत्तर विभाग
जा.क्र.लेखा/निविदा/१०२/२०१२
अहमदनगर दि.१७/०३/२०१२

**- सभेची नोटीस -**

अहमदनगर जिल्हा परिषद, काम वाटप समितीचे सदस्य,मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,अहमदनगर, कार्यकारी अभियंता जि.प.सा.बां.दक्षिण विभाग, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे उपस्थितीत काम वाटप समिती सभा **मंगळवार दि.२७/०३/२०१२** रोजी मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अहमदनगर तथा अध्यक्ष, काम वाटप समिती , यांचे अध्यक्षते खाली सकाळी ११.०० वाजता मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनात जि.प. अहमदनगर जि.अहमदनगर येथे खालील नमुद केलेल्या विषय पत्रीकेनुसार कामकाज चालविणेसाठी भरविण्यात येत आहे. सदर सभेमध्ये विविध विभागाकडील विविध लेखाशिर्षाखालील कामांचे वाटप करावयाचे आहे.

आपल्या विभागाकडील काम वाटपासाठी यादी (सुशिक्षीत बेराजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांची स्वतंत्रपणे) आपल्या कार्यालयाबाहेर दिनांक २१/०३/२०१२ रोजी लावुन तसेच जि.प.संगणक संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येऊन त्याची प्रत्येकी दोन प्रती या कार्यालयास पाठवावीत. तदनंतर दिनांक २१/०३/२०१२ ते २६/०३/२०१२ रोजी (शासकिय सुटटीचे दिवस वगळुन)दुपारी २.०० वाजेपर्यंत संबंधीताचे इच्छापत्र भरुन घेवुन दिनांक २६/०३/२०१२ रोजी सायंकाळी ४.०० वा. एकच इच्छापत्र व एकापेक्षा जास्त इच्छापत्र प्राप्त कामांचा विहित तक्ता सभेपुढे ठेवणे कामी सादर करावा. व त्याची एक प्रत आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डवर डकविण्यात यावी. तसेच सदर तक्ता जि.प.संगणक संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.

तरी आपणासं उपरोक्त सभेस उपस्थित राहणेची विनंती करण्यात येत आहे.

सदर बाबत न्यायालयात दावा क्र.२७/२०१० ची सुनावणी चालु असुन त्या अनुषंगाने न्यायालयिन बाब म्हणुन शासन निर्णयाचे काटेकोर पालन करण्यात येवुन सभेस उपस्थित रहावे हि विनंती

मा.अध्यक्ष काम वाटप समिती तथा
अति.मुख्य कार्यकारी अधिकारी ,
जि.प.अहमदनगर यांचे मान्यतेने

सचिव काम वाटप समिती
तथा
कार्यकारी अभियंता ,
जि.प.सा.बां.उत्तर विभाग
अहमदनगर

**विषय पत्रिका –**

**विषय क्रमांक-१ ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक ग्रासयो/२००७/प्रक्र.१/यो-७, दि.२०/४/२००७ व समक्रमांक दि.८/५/२००७ नुसार जिल्हा परिषद, स्तरांवर नोंदणी झालेल्या सुशिक्षीत बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था, यांना उपलब्ध यादीप्रमाणे जिल्हा परिषद विकास कामाचे वाटप करणे.**

**विषय क्रमांक २ – मा.सभा अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळच्या विषयावर चर्चा करणे.**

**प्रत माहितीसाठी**

१ मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद अहमदनगर यांना माहितीस्तव सविनय सादर
२ मा. उपाध्यक्ष, जिल्हा परिषद अहमदनगर यांना माहितीस्तव सविनय सादर
३ मा. सभापती, विषय समिती ------------------ ( सर्व ), जिल्हा परिषद अहमदनगर यांना माहितीस्तव सविनय सादर
४ मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद अहमदनगर यांना माहितीस्तव सविनय सादर
५ मा. अध्यक्ष, काम वाटप समिती, तथा अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना माहितीस्तव सविनय सादर
६ मा.कार्यकारी अभियंता प्रधानमंत्री ग्रामसडक योजना अहमदनगर यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव
७ कार्यकारी अभियंता, सा.बां.दक्षीण विभाग/ग्रापापु विभाग/ल.पा. विभाग, जि.प.अ.नगर यांचेकडेस माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
८ मा.जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, स्टेशन रोड अहमदनगर
९ उप अभियंता, जि.प.सा.बां. ------------/ग्रापापु ------------ यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी